महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील महिला व बाल विकास आयुक्तालय कार्यालयातील महिला व बाल विकास अधिकारी,जिल्हा परिषद पालघर या पदावर प्रतिनियुक्ती नियुक्ती मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्रमांक : मबाआ- २०१८/प्र.क्र.१६२/कार्या-७
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१९.

संदर्भ -१. ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. मविसे-१०१३/प्र.क्र.१२४/२०१३/आस्था- ३, दि.२८.०५.२०१३
२. महिला व बाल विकास पत्र क्र.मबाआ-२०१५/प्र.क्र.७/का-७-अ,दि.०९.०४.२०१५
३. सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.साप्रआ-१५१५/प्र.क्र.४०१/का-१९,दि.३१.०८.२०१५
४. महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. मबाआ-२०१५/प्र.क्र.१५१(भाग-२)/का.७, दि.०२.०१.२०१६
५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२ दि.१६.२.२०१८
६. शासन आदेश क्र.मबाआ-२०१८/प्र.क्र.८०/का-७,दि.३१.५.२०१८

शासन आदेश

संदर्भ क्र.४ अन्वये श्री. आर.एम.पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल,जिल्हा रायगड यांची महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील महिला व बालविकास अधिकारी,जिल्हा परिषद, पालघर या पदावर प्रथमत: दोन वर्ष अथवा सदर पदावर सरळसेवेने अधिकाऱ्याची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर संदर्भ क्र.६ अन्वये श्री.पाटील यांच्या प्रतिनियुक्तीस पुढील एका वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आली होती.

२. श्री आर.एम.पाटील यांच्या प्रतिनियुक्तीस सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ व दि.१६.२.२०१८ मधील तरतुदीन्वये पुढील एक वर्षाकरीता म्हणजेच दि.७.१.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच प्रतिनियुक्ती कालावधी संपुष्टात येताच त्यांनी त्यांच्या मूळ विभागात हजर होणे बंधनकारक राहील. संदर्भ क्र.४ च्या आदेशातील इतर अटीं व शर्ती पूर्वी प्रमाणेच लागू राहतील.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२५१४५५१८२५३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
२) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

३) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
४) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, बेलापूर, नवी मुंबई
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
७) मा.मंत्री, (म.व.बा.वि), यांचे खाजगी सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) मा.राज्यमंत्री, (म.व.बा.वि), यांचे खाजगी सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) श्री. आर.एम.पाटील, महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद पालघर